| | | |
|---|---|---|
| | अहमदनगर जिल्हा परिषद<br>आरोग्य विभाग<br>जिल्हा प्रशिक्षण केंद्र अहमदनगर | |
| वैद्यकिय अधिकारी जिल्हा प्रशिक्षण केंद्र<br>अहमदनगर दुरध्वनी क्रमांक :-<br>वैयक्तिक :-<br>कार्यालय :- | ७९८७३४८७९०<br>०२४१-२४३०५४४ | जिल्हा प्रशिक्षण<br>केंद्र,सिव्हिल हॉस्पिटल<br>कंपाऊंड अहमदनगर |
| E-mail ID: | dttnagar@rediffmail.com | |


जा.क्र./जिप्रके/ Support Staff/ ६४२४ /२०२४ — दि.२२/०७/२०२४

२४/७/२०२४

प्रति,

.....................................

.....................................

.....................................

विषय :- जिल्हा प्रशिक्षण केंद्र व रुग्णालय प्रशिक्षण केंद्र,अहमदनगर या दोन्हीही संस्थेसाठी मिळुन एक सफाई कामगार व एक सिक्युरिटी गार्ड यांचा पुरवठा करणे दरपत्रक पाठविणेबाबत....

संदर्भ :- मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहमदनगर यांचेकडील मंजुर टिपणी दि.१९/०७/२०२४

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये जिल्हा परिषद,अहमदनगर आरोग्य विभागाअंतर्गत जिल्हा प्रशिक्षण केंद्र व जिल्हा रुग्णालय अहमदनगर यांचे अंतर्गत रुग्णालय प्रशिक्षण केंद्र जिल्हा रुग्णालय आवारात कार्यरत आहे. सदर दोन्हीही संस्थासाठी मिळुन १ सफाई कामगार (स्वीपर) व १ सिक्युरिटी गार्ड स्वयंरोजगार/मजुर संस्थेमार्फत पुरविणे आवश्यक आहे.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या मंजुर पीआयपी मध्ये सफाई कामगार व सिक्युरिटी गार्ड यांचेसाठी जिल्हा प्रशिक्षण केंद्र व रुग्णालय प्रशिक्षण केंद्र यांना मिळुन रक्कम रु. **२,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये दोन लक्ष मात्र)** इतके अनुदान प्राप्त झोलेले होते. सदर मंजुर पीआयपी नुसार खर्च करणेस मा.प्राचार्य नाशिक यांचेकडुन सुचना प्राप्त झालेल्या आहेत.

तरी १ सपोर्ट सर्व्हिस स्टाफ (सकाळी ९.०० ते सका.११ पर्यंत,दुपारी २.०० ते साय.४.०० पर्यंत) व १ सिक्युरिटी गार्ड (सायं.८.०० ते सकाळी ६.०० पर्यंत) **सदर दरपत्रक मंजुर झालेपासुन एक वर्षासाठी पुरविणेबाबत** आपल्या संस्थेकडुन दरपत्रके मागविण्यात येत आहे.

Scanned with OKEN Scanner

तरी आपण आपल्या फर्मच्या नावे प्रति व्यक्ती दराप्रमाणे दोन व्यक्तीचे एकत्रित दर नमुद करुन सदर दरपत्रक जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर यांचे नावे बंद पाकिटामधुन आठ दिवसाचे आत वैद्यकिय अधिकारी, जिल्हा प्रशिक्षण केंद, जिल्हा रुग्णालय आवार, अहमदनगर यांचेकडे सादर करावे.

**अटी व शर्ती खालील प्रमाणे.**

१) सदर सेवा पुरविताना मजुर,स्वयंरोजगार,बेराजगार इ. संस्था यांना सदर निविदा मध्ये भाग घेता येणार आहे.

२) वैयक्तिक नावाने आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

३) सदर संस्थेचे रजिस्ट्रेशन असणे आवश्यक आहे.

४) सदर सफाई कामगार अथवा सिक्युरिटी गार्ड कामावर गैरहजर असल्यास त्या दिवसाचे वेतन बिलामधुन कमी करण्यात येईल.

५) पुरविण्यात येणा-या सफाई कामगार व सिक्युरिटी गार्ड यांचा जिल्हा प्रशिक्षण केंद्र व रुग्णालय प्रशिक्षण केंद्र यांचेसोबत काहीही संवंध नसेल. त्यांचे वेतन,भत्ते इ: सर्व जबाबदारी सदर संस्थेची अथवा निविदा धारकाची असेल.

६) सदर सफाई कामगार व सिक्युरिटी गार्ड यांच्या कोणत्याही तक्रारींचे समर्थन जिल्हा प्रशिक्षण केंद्र किंवा रुग्णालय प्रशिक्षण केंद्र करणार नाही.

७) बिलाची रक्कम ही सदर संस्थेच्या खातेवर बिल मिळाल्यानंतर आठ दिवसांचे आत अदा करण्यात येईल.

८) सदर दरपत्रक हे मंजुर झालेल्या दिनांकापासुन १ वर्ष कालावधीसाठी स्विकृतीस पात्र

दरपत्रकामध्ये नमुद केलेल्या दराव्यतिरिक्त नंतर कोणतेही जादा आकार नंतर अदा केले जाणार नाहित याची नोंद घ्यावी.

(डॉ.बापुसाहेब नागरगोजे)
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

*प्रत माहीतीस्तव सविनय सादर,*

- *मा.प्राचार्य,आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,नाशिक*
- *मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहमदनगर*

Scanned with OKEN Scanner